# PUNYA NAGARI

# पुण्य नगरी

04.11.2017

# परवाने रद्द करण्याच्या डीएमईआरच्या निर्णयाला डॉक्टर देणार आव्हान

**मुंबई :** पदवी घेतल्यानंतर एक वर्षासाठी ग्रामीण भागात काम न केलेल्या राज्यातील डॉक्टरांवर वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाने (डीएमईआर) केलेल्या दंडात्मक कारवाईला आता डॉक्टर समुदायाकडून विरोध होऊ लागला आहे. ज्या डॉक्टरांचे प्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहे आणि त्यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार दोन कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे, अशा डॉक्टरांच्या बाजूने बीईंग डॉक्टर्स ही सेवाभावी संस्था उतरली आहे. बीईंग डॉक्टर्सने या कारवाईचा विरोध करत याबाबत फेरविचार करावा, असे आवाहन केले आहे.

डीएमईआरने लादलेली दंडात्मक कारवाई अत्यंत कठोर स्वरूपाची आहे. डीएमईआरने डॉक्टरांना पोस्टिंग देण्याकडे दुर्लक्ष केले होते, याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न बीईंग डॉक्टर्सने केला होता. अशी सेवा देण्याबाबतच्या बॉण्डवर स्वेच्छेने स्वाक्षऱ्या केल्या असल्याचे डॉक्टरांनी म्हटले असून, याबाबत डीएमईआरकडून आमचा अभ्यासक्रम संपल्यानंतर कोणत्याही प्रकारे संवाद साधला गेला नाही, असे स्पष्ट केले आहे. सरकारसोबत सहकार्याने काम करण्याची डॉक्टर समुदायाची इच्छा असून या मुद्द्यावर त्यांना तोडगा काढायचा आहे. प्रत्येक व्यावसायिकाला त्याचा व्यवसाय करण्याचा आणि उत्पन्न कमावण्याचा अधिकार आहे. त्यांची नोंदणी रद्द करणे आणि त्यांचे परवाने काढून घेणे, यातून थेट त्यांच्या कुटुंबाची उपजीविकाच धोक्यात येते. याबाबत माहिती देताना बीईंग डॉक्टर्सचे अध्यक्ष दीपक चतुर्वेदी म्हणाले की, कोणताही डॉक्टर बॉण्डनुसार सेवा करण्यास नकार देत नाही. डॉक्टरांनी स्वेच्छेने या बॉण्डवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत आणि ते ग्रामीण भागात कुठेही नियुक्ती केली तरी तेथे सेवा देण्यास तयार होते. या डॉक्टरांचा परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर त्यांना ठरावीक काळात या बॉण्डनुसार ग्रामीण भागात तैनात करावे, असे सरकारी अध्यादेशात म्हटले आहे. मात्र काही अपवाद वगळता बहुसंख्य डॉक्टरांना त्यांच्या पोस्टिंगबाबत काहीही संपर्क झाला नाही आणि काही काळानंतर त्यांनी स्वतःची प्रॅक्टिस सुरू केली. या डॉक्टरांची काहीही चूक नसताना, डीएमईआरचा हा निर्णय डॉक्टरांसाठी धक्कादायक आहे.

## ग्रामीण भागातील त्रुटींकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

ग्रामीण भागात ज्यांची पोस्टिंग झाली आहे, त्यांनी ग्रामीण भागातील रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबांची पुरेशा साधनांविना होणारी हेळसांड पाहिली आहे. अगदी प्राथमिक आरोग्य केंद्रात किमान पायाभूत सुविधा, औषधे आणि अन्य सुविधा यांचा ग्रामीण भागात पुरवठा होणे अत्यंत दुर्लभ आहे. या त्रुटींकडे प्रशासन दुर्लक्ष करते, ही आमच्याकरिता दुःखद बाब आहे. दुसरीकडे तेच डॉक्टरांना धमकावून, वाईट परिणामांचे इशारे देऊन त्यांची उपजीविका हिरावून घेण्याचा प्रयत्न करते हे योग्य नाही. सरकारने याबाबत व्यावहारिक तोडगा काढावा आणि या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी आम्ही विनंती करतो, असे बीईंग डॉक्टर्सच्या सहसचिव डॉ. स्नेहल भंगे यांनी म्हटले आहे.